लोकसत्ता, ७ सप्टेंबर २०११, पान क्र. २.

# खगोलभौतिकी ऑलिम्पियाडमध्ये भारत चमकला

## पाच पदकांची कमाई

**मुंबई, ६ सप्टेंबर / प्रतिनिधी**

पोलंड येथे पार पडलेल्या पाचव्या आंतराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूने अव्वल कामगिरी करीत पदक तक्त्यामध्ये पहिले स्थान पटकावले आहे. या स्पर्धेत भारताने एकूण तीन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य पदकांची कमाई केली. हैदराबादच्या इनाला जीवना प्रिया या विद्यार्थिनीने लेखी परीक्षेतील सर्वोत्तम कामगिरीसाठीचा पुरस्कार मिळविला. तर प्रात्यक्षिक परीक्षेतील सर्वोत्कृष्ट कामगिरीचा पुरस्कार अक्षय कृष्णा या बंगलोरच्या विद्यार्थ्याने पटकावला. सुवर्ण पदकाची कमाई करणारी जीवना ही या स्पर्धेतील एकमेव मुलगी ठरली आहे. या दोघांबरोबरच अहमदाबादच्या शरद मिरानी यानेही भारतासाठी सुवर्ण पदक पटकावले. तर हैदराबादच्याच शशीभूषण भारद्वाज याने रौप्य आणि कोलकाताच्या अखिल केडीया याने कांस्य पदक भारताच्या पारड्यात टाकले आहे. या बरोबरच सांघिक स्पर्धेत भारताने द्वितीय क्रमांकासह रौप्य पदकावर आपले नाव कोरले आहे.'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रा'चे डॉ. अनिकेत सुळे आणि डॉ. अन्वेश मुझुमदार यांनी या संघाचे नेतृत्व केले. तर केंद्राचे आनंद घैसास वैज्ञानिक निरीक्षक म्हणून संघासोबत होते. चीन, कोरीया, रशिया आदी २६ देशांतील विद्यार्थ्यांचे चमू यात सहभागी झाले होते. लेखी आणि प्रात्यक्षिके या मार्फत विद्यार्थ्यांचे खगोलशास्त्रविषयीचे ज्ञान यात पडताळण्यात येते.

## ऑलिम्पियाडमध्ये महाराष्ट्र

आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या खगोलभौतिकी ऑलिम्पियाड स्पर्धेसाठी होणाऱ्या निवड प्रक्रियेचे केंद्र जरी मुंबईत असले तरी यंदाच्या चमूत एकाही मराठी विद्यार्थ्याचा समावेश नव्हता हे विशेष. मुंबईच्या 'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रा'तर्फे राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या चाचणी फेऱ्यांमधून ऑलिंपियाडसाठी पाच विद्यार्थ्यांचा चमू निवडला जातो. परंतु, पहिले २००७ हे वर्ष वगळता आजवरच्या ऑलिंपियाडमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीय होता. २००९साली तर पाचपैकी तीन विद्यार्थी हे महाराष्ट्रातील होते. तर २०१० साली दोन आणि २००८साली एक महाराष्ट्रीय विद्यार्थ्याचा समावेश चमूमध्ये होता. पण, या वर्षीच्या चमूत एकही नाव महाराष्ट्रातील नव्हते. पाच वर्षांपूर्वी म्हणजे २००७ मध्ये जेव्हा पहिली आंतरराष्ट्रीय खगोलभौतिकी ऑलिंपियाड स्पर्धा झाली तेव्हा भारताचे प्रतिनिधित्त्व करणाऱ्या पाच विद्यार्थ्यांपैकी एकही विद्यार्थी महाराष्ट्रातील नव्हता. पाच वर्षानंतर ती वेळ पुन्हा येऊन ठेपली आहे. वास्तविक महाराष्ट्राला मोहन आपटे, जयंत नारळीकर या मराठी खगोलशास्त्रांची परंपरा आहे. खगोलशास्त्राविषयी विद्यार्थ्यांच्या मनात कुतूहल निर्माण करण्याचे कामही या शास्त्रज्ञांनी आपापल्या परीने केले आहे. हे जरी असले तरी मराठी मुले यात मागे का पडतात याचे उत्तर देताना केंद्राचे डॉ. अनिकेत सुळे म्हणाले की, महाराष्ट्राला जरी खगोलशास्त्राची परंपरा असली तरी गेली काही वर्षे या विषयी इतर राज्यातील विद्यार्थ्यांमधले कुतूहल वाढते आहे. परिणामी त्यांचा ऑलिंपियाडमधील सहभाग वाढला आहे.